# प्रेस नोट

## शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद सोलापूर

## बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम (RTE ॲक्ट २००९ नुसार) २५ टक्के ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया

## सन २०१८-२०१९

सोलापूर दि.०९/०२/२०१८:- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम (RTE ॲक्ट २००९ नुसार) वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के प्रवेश प्रक्रिया सन २०१८-२०१९ शैक्षणिक वर्षात ऑनलाइन पध्दतीने होणार असून शासन निर्णय दि.२६/०१/२०१८ व मा.शिक्षण उपसंचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य.पुणे यांचेकडील दि.०९/०२/२०१८ च्या पत्रानुसार तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे प्रवेश प्रक्रिया सोलापूर शहर व जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक विनाअनुदानित. कायम विना अनुदानित. स्वयंअर्थसहाय्यित (अल्पसंख्याक व धार्मिक पाठशाळा वगळून) अशा सर्व माध्यमांच्या व सर्व बोर्डांच्या शाळांना लागू राहील. सन २०१८-२०१९ चे प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया खालील प्रमाणे आहे. याची नोंद सर्वांनी घ्यावी. ज्या पालकांना आपल्या पाल्यास RTE २५ टक्के अंतर्गत शाळेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांनी आपले प्रवेशासंबंधित आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत तसेच दिलेल्या वेळापत्रकानुसार मदत केंद्र व शाळेच्या संपर्कात राहून प्रवेशाचा लाभ घ्यावा.

ऑनलाईन अर्ज करण्यासाठी संकेतस्थळ https://student.maharashtra.gov.in

**वेळापत्रक**

| अ.क्र. | बाब | दिनांक |
|---|---|---|
| १ | पालकांनी ऑनलाईन अर्ज भरून अंतिम करणे.(Confirm) | दि.१०/०२/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ |
| पुढील वेळापत्रक शासनाकडील मार्गदर्शनानुसार अंमलबजावणी करण्यात येईल याची नोंद घ्यावी. | | |

**२५ टक्के प्रवेशाकरिता / अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व इतर बाबी.**

१. रहिवास पुरावा:- आधार कार्ड. निवडणुक ओळखपत्र.विजबील.घरपट्टी.वाहन परवाना.नोंदणीकृत भाडेकरारनामा (भाडे तत्वावर राहणा-या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत आवश्यक) (सर्व घटकांना लागू)

२. जातीचे प्रमाणपत्र (वडीलांचे /बालकांचे):- तहसिलदार/उपजिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र (परराज्यातील जातीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.)

३. जन्म दाखला पुरावा:-ग्रामपंचायत /न.पा/म.न.पा यांचा दाखला

४. कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला:- सदरची अट अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती मधील विद्यार्थ्यांच्या पालकांना लागू नाही. आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पालकांचा उत्पन्नाच्या दाखला रु.१ लाखापेक्षा कमी उत्पन्न असावे. उत्पन्नाचा दाखला प्रवेश प्रक्रिया सुरु होणा-या एक वर्षापुर्वीच्या आर्थिक वर्षातील असावा. उदा.सन २०१८-२०१९ मध्ये प्रवेश घेताना पालकांचे सन २०१६-२०१७ या वर्षातील उत्पन्नाचा दाखला प्रवेशाकरिता ग्राहय समजण्यात यावे. उत्पन्नाचे दाखले संबंधित प्राधिकारी (तहसील कार्यालय) यांनी प्रमाणित केलेले असावेत. हे दाखले तपासण्याचे अधिकार शाळांना असणार नाहीत. आर्थिक दुर्बल घटकातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या दाखल्याची पडताळणी महाऑनलाईन च्या Portal द्वारे ऑनलाइन पध्दतीने करण्यात येईल.पालकांनी बनावट/बोगस उत्पन्नाच्या दाखल्यांचा वापर २५टक्के प्रवेशाकरिता करू नये. बनावट/बोगस उत्पन्नाच्या दाखल्यांच्या वापर केल्याचे निदर्शनास आल्यास.झालेले प्रवेश रद्द करण्यात येतील व संबंधित पालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. घटस्फोटित महिला:- १)न्यायालयाचा निर्णय २) घटस्फोटित महिलेचा/बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा ३) बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक दुर्बल घटकातील असल्यास तर बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

६. न्यायप्रविष्ट असलेल्या घटस्फोटा प्रकरणातील महिला:- १) प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा पुरावा २) घटस्फोट प्रकरण न्यायप्रविष्ट असलेल्या महिलेचा/बालकाच्या आईचा रहिवाशी पुरावा. ३) बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्यांच्या वडीलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक घटकातील असल्यास तर बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

७. विधवा महिला :- १) पतीचे मृत्यू प्रमाणपत्र २) विधवा महिलेचा/बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा ३) बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्यांच्या वडीलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक दुर्बल घटकातील असल्यास तर बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

८. अनाथ बालक:- अनाथ बालकांच्याबाबत अनाथालयाची कागदपत्रे ग्राहय धरण्यात यावीत. जर बालक अनाथलयात राहत नसेल तर ते पालक सांभाळ करतात त्यांचे हमीपत्र आवश्यक राहिल.

९. दिव्यांग बालके:- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अपंगत्वाचे प्रमाणपत्र ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त प्रमाणपत्र असावे.

१०. पालकांनी आरटीई २५ टक्के अंतर्गत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरत असताना जास्तीत-जास्त कोणत्याही १० शाळा निवडाव्यात. परंतू प्रथम लॉटरीव्दारे ज्या शाळेत निवड झाली तेथे प्रवेश घ्यावा लागेल अन्यथा प्रवेश रद्द होईल. दुसऱ्या फेरीत विचार केला जाणार नाही.

११. सन २०१८-२०१९ या वर्षी इ.१ली मध्ये प्रवेश घेण्याऱ्या बालकाचे दि.३०/०९/२०१८ रोजी किमान वय ५.८ वर्षे इतके असेल.

१२. ऑनलाईल अर्ज करतेवेळी पालकांनी कोणतेही कागदपत्र अपलोड करू नये. मात्र आर्थिक दुर्बल घटकातील पालकांनी उत्पन्नाच्या दाखल्यावरील बारकोड खालील नमुद क्रमांक ऑनलाइन अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे. तसेच त्याचे validation-ऑनलाइन व्यवस्थेव्दारे होईल.

१३. पालकांनी ऑनलाईन अर्ज करताना अचुक व खरी माहिती भरावी. (उदा.घरचा पत्ता,जन्म दिनांक,उत्पन्नाचा दाखला,जातप्रमाणपत्र इ)

१४. पालकांनी काही अडचणी असल्यास सोलापूर शहरासाठी प्रशासन अधिकारी. प्राथमिक शिक्षण मंडळ नवी पेठ क्रांती साडी सेंटर समोर दगडी इमारत सोलापूर आणि तालुक्यासाठी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कार्यालयाकडे संपर्क साधावे. असे आवाहन जिल्हा परिषद सोलापूर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संजयकुमार राठोड यांनी केलेले आहेत.

Sd/-
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद. सोलापूर

प्रत.

१ गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती(सर्व)/प्रशासन अधिकारी. प्राथमिक शिक्षण मंडळ सोलापूर महानगरपालिका
२/-वरील निवेदन आपल्या अधिनस्त शाळांना कळवून स्थानिक दैनिकात प्रसिध्द दयावी.

२. मा.संपादक.----------------------
वरील निवेदन आपल्या लोकप्रिय दैनिकात / चॅनेलवर प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती.

३. IT cell : जि.प. सोलापूर,
2/- जि.प.सोलापूरच्या संकेतस्थळावरुन प्रसिद्ध करावी.